दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६९१३४१, २५६०१२०३
२५६०१२१८, २५६९६०६१
२५६९००६२, २५६९००६०
२५६९७२३२

# पुणे विद्यापीठ

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०-२५६०१२०६
०२०-२५६९१३४१
Website : www.unipune.ernet.in
e-mail : coe@unipune.ernet.in

परीक्षा-समन्वय/१५९९

दिनांक- २०.११.२००९

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये व
सर्व मान्यताप्राप्त संस्था

विषय : महाविद्यालयास/संस्थेस विद्यापीठ परीक्षांचे केंद्र म्हणून मान्यता मिळण्याबाबत.

महोदय/महोदया,

वरील विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, पुणे विद्यापीठाने ज्या महाविद्यालयांना कला, ललितकला व प्रयोगजीवीकला मानस,नीती व समाजविज्ञान,वाणिज्य,विज्ञान,शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र,व्यवस्थापन,विधी व अभियांत्रिकी इ. विद्याशाखेतील अभ्यासक्रमासाठी नव्याने मान्यता दिलेली आहे, अशा महाविद्यालयांना नव्याने परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळण्यासाठी परीक्षा परिपत्रक क्रमांक ३०३ दिनांक ०८.०९.२००८ अन्वये विद्यापीठास अर्ज करणे अनिवार्य आहे. सदर परीक्षा परिपत्रक क्र. ३०३ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unipune.ernet.in Link to students helpline and Examination Info) उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

सद्य परिस्थीतीत नव्याने सुरु झालेल्या महाविद्यालयांना, महाविद्यालय क्रमांक व परीक्षा केंद्र क्रमांक हे कार्यालयीन कामाच्या सोयीसाठी तात्पुरते देण्यात आलेले आहेत. त्यामुळे अशा महाविद्यालयांना/संस्थांना परीक्षा केंद्र मंजूर करण्यात आलेले आहे असे गृहीत धरु नये.

याबाबत पुढे आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालय/संस्थेस परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळण्यासाठी वरील नमूद परीक्षा परिपत्रक क्रमांक ३०३ प्रमाणे विहित नमुन्यामधील अर्ज करणे अनिवार्य असल्याने त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(परीक्षा समन्वय)